**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र.४७ /२०१५-१६/२०५ दिनांक: ११/१/२०१६

**आदेश**
**आदेश केस क्र. ४७ /२०१५-२०१६**

१) सम्यक मागासवर्गीय औदयो. अर्जदार
उत्पादक सहकारी संस्था
ग.क्र.९९९ दत्त स्पिनिंग मिल्स मागे
हातकणंगले जि.कोल्हापूर.

विरुध्द

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर.

२) उपकार्यकारी अभियंता, (१) विरुध्द पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय कोल्हापूर.

**कोरमः-** १. श्री. एन. बी. बारसिंग, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

मी श्री. एन.बी. बारसिंग सदस्य सचिव ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

आज दि. २९/१२/२०१५ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर येथे सम्यक मागासवर्गीय औदयोगिक उत्पादक सह. संस्था गट क्र.९९९ दत्त स्पिनिंग मिल्स मागे इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर यांच्या केस क्र. ४७ ची सुनावणी झाली. सुनावणीसाठी संस्थेच्या वतीने संचालक श्री. संतोष भूपाल चोकाकर आणी ग्राहक प्रतिनिधी म्हणून श्री. मुकुंद महादेव माळी हे उपस्थित होते. वि.प. महावितरणचे श्री. आरळी एस.एस. नोडल ऑफिसर कोल्हापूर यांचे वतीने उपस्थित होते.

## तक्रारीचे स्वरुप/ग्राहकाची मागणी

सम्यक मागासवर्गीय औदयोगिक सहकारी संस्था यांनी **अ** फॉर्ममध्ये दि. २१/१०/२०१५ रोजी मंचाकडे अर्ज सादर केला आहे. यामध्ये त्यांनी सुरक्षा ठेव म्हणून भरलेल्या रक्कमेवर व्याजाची मागणी केली आहे. सुरक्षा ठेवीची रक्कम रु. १४१२०००/- (रु. चौदा लाख बारा हजार) त्याना परत मिळाली आहे. पण त्यांनी दि. २३.१२.२०११ ते १७.५.२०१४ या कालावधीचे व्याज मागीतले आहे.

अंतर्गत कक्ष कोल्हापूर येथे व्याजासाठी त्यांनी **क्ष** फॉर्ममध्ये तक्रार दाखल केली होती. कक्षाने मंचास सादर केलेल्या पत्रामध्ये मंडल कार्यालयाकडून तक्रादाराच्या मागणी प्रमाणे सुरक्षा ठेवीवरील व्याज मिळण्याच्या मागणीचा प्रस्ताव मुख्य कार्यालयाकडे पाठविला आहे. तसे अपील कर्त्यास दि. १०/८/२०१४ रोजीच्या पत्रान्वये कळविणेत आले आहे असे म्हटले आहे. तसेच मंडल कार्यालयाने दि. २३.७.२०१४ मुख्य कार्यालयास पाठविलेलया पत्राची प्रत मंचास सादर केली आहे. नोडल अधिकारी यांच्यातर्फे चर्चा करतांना सदर मागणी अमान्य केल्याचे कोठेच म्हटलेले नाही. हा प्रस्ताव विचाराधीन आहे असा उल्लेख केला आहे.

## यावर खालील मुददे उपस्थित होतात

१. सुरक्षा ठेव म्हणून ठेवलेल्या रक्कमेवर व्याज देता येईल का?
उत्तर :- होय
२. आदेश
उत्तर :- अंतिम आदेशाप्रमाणे

## कारण मिमांसा

एखादया ग्राहकाला ज्यावेळी मागणी अर्ज मंजूर करुन सुरक्षा रक्कम जमा करणेचे/मंजूरीपत्र दिले जाते त्यावेळी ज्या अटी असतात, त्यामध्ये कनेकशन चालू करुन घेणेसाठी कांही अटी आणी तरतूदीची कल्पना ग्राहकास लेखी दिली जाते. माननीय आयोगाने सुरक्षा ठेववीवर व्याज देण्याची तरतूद विनिमयात केली आहे. विनिमय २००५ च्या कलम ११.१२ नुसार ग्राहकाने रोख रक्कम सुरक्षा अनामत ठेवल्याच्या दिनांका पासून वितरण परवानाधारकाने परताव्याची रक्कम पाठविल्याच्या दिनांका पर्यत सुरक्षा अनामतीवर व्याज देय राहील असे स्पष्ट म्हटलेले आहे.

सदर संस्थेने भरलेले पैसे महावितरणने सुरक्षा ठेव म्हणून स्विकारले असतील तर तो ग्राहक नियमाप्रमाणे व्याज मिळण्यास पात्र आहे असे मंचाचे मत आहे.

सुरक्षा ठेवीवरील व्याज हे बिलाच्या रक्कमेतून देणेची तरतूद महावितरणच्या कार्यप्रणालीमध्ये आहे. या केसमध्ये ग्राहकाने वीज जोडणी घेतलेली नाही, सबब रिझर्व्ह बॅकेच्या बॅक रेटने दि. २३.१२.२०११ ते १७.५.२०१४ या कालावधीचे व्याज अकौंट पेई चेकने देण्यांत याव. पोंच रक्कमेची नियमाप्रमाणे पावती घेण्यांत यावी.

## आदेश

१. ग्राहकाची मागणी मंजूर करण्यांत येत आहे.

२. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता
येईल.

दिनांक : ११/०१/२०१६

(एन. बी.बारसिंग)
सदस्य सचिव

अध्यक्ष पद दिनांक १६-१२-२०१४ पासून रिक्त.

श्री. पी. एस. बुरांडे,
ग्राहक सदस्य,

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.